रे. दिवाणी मुकदमा क्र. १४२/२०१३ मधील निशाणी क्र. १८३ वरील आदेश
(शहाजी करांडे वि हणमंत करांडे वगैरे)
(CNR No. MHSN130005102013)

१. वादी यांनी सदरचा अर्ज हा जास्तीचा मुददा काढणेकामी सादर केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. १ यांनी या दावेचे कामी कैफियत दाखल केलेली असून त्यामध्ये वादीची आई मरण पावलेनंतर त्यांनी प्रवादी क्र. ७ सोबत सन १९७७ मध्ये रुढी व रितीरिवाजाप्रमाणे लग्न केले असलेचे नमूद केलेले आहे. त्यांनी सदरची गोष्ट नमूद करताना अंदाजे १९७६ साली वादीची आई मरण पावली असलेचा उल्लेख केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यामुळे प्रवादी क्र. १ यांनी वादीची आई मरण पावलेवर प्रवादी क्र. ७ सोबत लग्न केले होते याबाबत मुददा काढणे आवश्यक आहे. प्रवादी यांनी अशाप्रकारे विधान केले असलेने तो सिध्द करणेपण त्यांचीच जबाबदारी आहे.

२. प्रवादी यांनी आपले म्हणणे नि.१८४ वर दाखल केलेले आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे ११/०८/२०१४ रोजी नि.७६ वर मुददे काढणेत आले होते. त्यानंतर दोन्ही बाजूंचा पुरावा पूर्ण झालेवर दावा अंतीम युक्तीवादासाठी ठेवणेत आलेला होता. कोणतेही कारण उपलब्ध नसताना जाणीवपूर्वक दावेचे कामी विलंब करणेसाठी सदरचा अर्ज सादर केलेला आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या आईची सिव्हील डेथ झाली आहे असे ठरवून मिळणेसाठी त्यांनी विनंती केलेली आहे. वादी यांनी केलेल्या

कथनांप्रमाणे १९७७ साली त्यांची आई हयात असताना प्रवादी क्र. १ याने प्रवादी क्र. ७ शी विवाह केला असलेने तो बेकायदेशीर असलेबददलचे विधान केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी यांनीच संबंधीत मुददा स्पष्ट करणे आवश्यक असताना या अर्जाद्वारे तो प्रवादीकडे सोपविणेत येत आहे. त्यामुळे प्रवादी यांनी सदरचा अर्ज रदद होणेविषयी विनंती केलेली आहे.

३. वादी यांचे विद्वान वकील श्री डी.एन. घाडगे व प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. पी.टी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | प्रवादी क्र. १ व ७ यांचा १९७७ ला विवाह झाला होता याबाबतचा जास्तीचा मुददा प्रवादीच्या बाजूने काढणे आवश्यक आहे काय ? | नाही |
| २ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

४. वादी यांचे विद्वान वकील यांच्या म्हणण्याप्रमाणे या दावेचे कामी पूर्वी जे मुददे काढणेत आलेले आहेत त्याअनुषंगाने प्रवादी क्र. १ व प्रवादी क्र. ७ यांचा विवाह

बेकायदेशीर असून त्यांची आई हयात असताना तो प्रवादी क्र. १ यांनी केलेला आहे. प्रवादी क्र. १ यांने त्यावेळी कोणत्याहीप्रकारे वादीच्या आईपासून फारकत घेतलेली नव्हती. त्यामुळे या दावेचे कामी प्रवादी क्र.३ ते ७ यांना दावा मिळकतीमध्ये कोणत्याहीप्रकारे हक्क प्राप्त होवू शकत नाहीत. त्यामुळे त्याप्रमाणे मुददा काढणेविषयी विनंती केलेली आहे. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. पी.टी. जाधव यांनी युक्तीवाद सादर केला की या दावेचे कामी वादी यांनी त्यांच्या आईला प्रवादी क्र. १५ म्हणून दावेचे कामी सामील केलेले होते. तसेच त्याविषयीचे जे कथन केलेले होते त्याअनुषंगाने ती हयात असलेबददलचे विधान त्यांनी केलेले होते. वादींनी जे काही म्हणणे दाव्यामध्ये मांडलेले त्याअनुषंगाने प्रवादी यांनी आपला बचाव सादर केलेला होता. प्रवादी यांचेविरुध्द अशाप्रकारे जर जास्तीचा मुददा काढला तर निश्चितच त्यांना अनावश्यकरीत्या दावेचे कामी वेगळा पुरावा सादर करावा लागू शकतो. प्रवादी यांनी जो बचाव सादर केलेला आहे तो वादीच्या विधानाच्या अनुषंगाने असलेने वादी यांनी आधी त्यांची केस त्याबाबत स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसे न झालेस प्रवादी यांना निष्कारण त्यामुळे त्रास होवू शकतो.

५. वादी व प्रवादी यांनी यापूर्वी केलेले कथन जर पाहिले तर मुळ दावेचे कामी प्रवादी क्र. १५ पदमिनी हणमंत करांडे या १९७६–७७ च्या कालावधीमध्ये हयात असलेबाबतचे कथन वादींनी केलेले आहे. त्याचा मानसिक धक्का सुलोचना उर्फ पदमिनी हिला बसलेने ती मनोरुग्ण होवून डिसेंबर २००४ साली बेपत्ता झाली असलेचे म्हटलेले आहे. वादीनी त्याबाबत पुन्हा दुरुस्ती करुन घेतली असून ती २०१४ ला

बेपत्ता झाली असलेचे म्हटले आहे. यावरुन त्यांची आई प्रवादी क्र. १ व ७ यांच्या विवाहाचे वेळी हयात होती व ती त्यानंतर मनोरुग्ण झाली व बेपत्ता झाली ही केस वादीची आहे. प्रवादी यांची जर नि. ३६ वरील कैफियत पाहिली तर प्रवादी यांनी ती अंदाजे १९७६ ला मरण पावली असलेबददलचा बचाव सादर केला असलेचे दिसून येते. या दोन्हीही विधानांपैकी वादी यांनी जे विधान केलेले आहे ते त्यांच्या दाव्याच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे ते सिध्द करणेची जबाबदारी त्यांचीच आहे. ते स्वतःच्या दाव्याच्या कामी त्यामुळे प्रवादीच्या कैफियतीचा आधार घेवू शकत नाहीत.

६. वादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी पुरावा दिलेस त्याअनुषंगाने प्रवादी आपल्या कथनाप्रमाणे बचाव सादर करु शकतो व त्या दोन्हीही बाजूच्या म्हणण्याप्रमाणे जो पुरावा प्राप्त होईल त्याअनुषंगाने त्याचा निर्णय नंतर करता येवू शकतो. या दावेचे कामी वादींनी आई बेपत्ता होणेविषयी पूर्वीही दुरुस्ती मिळवलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी दुरुस्त दावापण दाखल केलेला आहे. या दाव्याचे कामी पूर्वी अतिरिक्त मुददा क्र.५ हा काढणेत आला होता ज्यामध्ये ''वादी हा सुलोचना उर्फ पदमिनी यांचा मुलगा असलेचे सिध्द करतो काय? तसेच पदमिनी या प्रवादी क्र. १ ची प्रथम पत्नी असलेचे वादी सिध्द करतो काय?'' मुददा क्र. ५ जर पाहिला तर तो वादीच्या कथनाच्या अनुषंगाने पूर्वीच काढलेला असून प्रवादी क्र. १ ही प्रथम पत्नी असलेविषयी मुददा काढणेत आलेला आहे. निश्चितच प्रवादी यांना जर बचाव सादर करायचा असेल तर त्याअनुषंगानेच त्यांना बचाव सादर करणे आवश्यक आहे. वादी यांनी सादर केलेला नवीन जास्तीचा मुददा जर

पाहिला तर तो अनावश्यक असलेचे दिसून येते. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

७. सदरचा दावा हा अंतीम युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. प्रवादीच्यावतीने मुददा काढावा अशाप्रकारची कोणतीही केस उपस्थित नसताना वादींनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे. वादी यांनी जो अर्ज सादर केलेला आहे त्याला कोणतेही पुरेसे कारण उपलब्ध नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

**<u>आदेश</u>**

१. वादींचा अर्ज रदद करणेत येतो.

२. वादी यांनी प्रवादी क्र. १ ते ७ यांना १,०००/– रुपये खर्च अदा करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2020.02.04 11:17:03 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – ०३/०२/२०२० दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 03/02/2010 |
| Order signed by the | : 03/02/2010 |

Presiding Officer on.

Order uploaded on : 04/02/2010